# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक : 12.10.2026** **वार : सोमवार**

---

## ठळक बातम्या

1. **ग्रामीण भागाचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावं; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आवाहन.**
2. **राज्यात सर्वत्र शारदीय नवरात्रोवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ.**
3. **पुण्यात गेले काही दिवस सुरू असलेलं एमपीएससी परिक्षार्थींचं आंदोलन स्थगित.**
4. **दुसऱ्या टी-20 सामन्यात वेस्ट इंडिजवर विजय मिळवत भारताची मालिकेत 2-1 अशी आघाडी.**

## सविस्तर बातम्या

**पंचायतराज अभियान**

ग्रामीण भागाचा शाश्वत आणि सर्वांगीण विकास साधण्यासाठी लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे काम करावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या पुरस्कार सोहळ्यात ते काल नाशिकमध्ये बोलत होते. यंदाच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य द्यावं, असं आवाहन त्यांनी केलं. या कामांसाठी आवश्यक निधी राज्य शासन उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी दिली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

तसंच पहिल्या टप्प्यात उत्कृष्ट कामगिरी करण्याऱ्या जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचयतीच्या पदाधिकाऱ्यांचा त्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या पहिल्या वर्षात नाशिक जिल्हा परिषदेने प्रथम तर पुणे जिल्हा परिषदेनं राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला आहे, सांगली जिल्हा परिषद तृतीय स्थानावर आहे.
पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील आडाचीवाडी ग्रामपंचायतीनं राज्यात प्रथम क्रमांक पटकावला असून, पाच कोटी रुपयांचं बक्षीस मिळवलं आहे.

**मुख्यमंत्री-कुंभमेळा**

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर होणारी विकासकामं निर्धारित वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्र्यांनी काल नाशिक शहराच्या विविध भागांना भेट देऊन सुरू असलेल्या विकासकामांची पाहणी केली. ही विकासकामं केवळ कुंभमेळ्यापुरती मर्यादित नसून, पुढच्या 25 ते 30 वर्षांसाठी नाशिक आणि त्र्यंबकेश्वरच्या विकासाचा पाया मजबूत करणारी आहेत, असं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

**केंद्रीय पाहणी पथक**

राज्यातल्या शेतकरी, शेतमजूर आणि ग्रामीण भागातल्या नागरिकांना पुढचे 6 ते 8 महिने अधिक आधार देण्याची आवश्यकता आहे; आणि त्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात येत आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिली. केंद्रीय दुष्काळ पाहणी पथकासमवेत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. रोजगार आणि अन्नसुरक्षेच्या योजनांच्या माध्यमातून

नियोजन करून शेतकऱ्यांसह शेतमजुरी करणाऱ्यांनाही मदत देण्यात येईल; विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ लवकर मिळवून देण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या सहकार्यानं प्रयत्न करेल, असंही ते म्हणाले

**कृषी कर्ज पुनर्गठन**

शेतकऱ्यांच्या कृषी कर्जाचं पुनर्गठन तसंच शेतीसंबंधित गरजांसाठी नवीन किंवा अतिरिक्त कर्ज उपलब्ध करून देण्याचे निर्देश राज्यस्तरीय बँकर्स समितीनं बँकांना दिले आहेत. राज्य सरकारचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष प्रभात किरण यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली काल पुण्यात बैठक झाली. त्यावेळी हे निर्देश देण्यात आले.

**राज्य नवरात्रौत्सव**

राज्यातल्या साडे तीन शक्तीपीठांच्या मंदिरांमध्ये काल घटस्थापनेनं शारदीय नवरात्रोत्सवाला सुरुवात झाली. करवीर निवासिनी महालक्ष्मी अंबाबाई मंदिरात मानाच्या तोफेची सलामी देऊन शारदीय नवरात्रौत्सवाला सुरुवात झाली. काल पहिल्या दिवशी देवीची नंदादेवी रुपात पूजा बांधण्यात आली होती. तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिरातल्या कल्लोळ तीर्थापासून डोक्यावर पाण्याने भरलेले मातीचे घट घेऊन मिरवणूक काढण्यात आली. नांदेड जिल्ह्यातल्या माहूर गडावर रेणुका मातेच्या मंदिरात, तसंच नाशिक जिल्ह्यातील सप्तश्रृंग गडावरही विधिवत घटस्थापना करण्यात आली. सप्तश्रृंग गडावर काल दिवसभरात 75 हजार भाविकांनी सप्तश्रृंगी मातेचं दर्शन घेतल्याची माहिती देवस्थानच्या सूत्रांनी दिली. राज्यात सर्वत्र ठीकठिकाणच्या देवीच्या मंदिरांमध्ये अत्यंत उत्साहात नवरात्रौत्सवाची सुरुवात झाली.

मिरजमध्ये आयोजित शारदीय नवरात्र संगीत महोत्सवाचं उद्घाटन ज्येष्ठ गायक पंडीत भुवनेश कोमकली यांच्या हस्ते झालं. तर 32व्या पुणे नवरात्र महोत्सवाचं उद्घाटन मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते गणेश कला क्रीडा रंगमंच इथं झालं. दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना मदत करण्यासाठी पुणे नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून निधी उभारावा, असं आवाहन सामंत यांनी यावेळी केलं.

**सेवा संकल्प अभियान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या सार्वजनिक क्षेत्रातील कारकीर्दीची 25 वर्षे पूर्ण करत आहेत. यानिमित्त सुरू असलेल्या आमच्या विशेष वृत्तमालिकेत आज जाणून घेऊया सागरमाला या कार्यक्रमाविषयी...

***देशाच्या किनारपट्टीला विकासाचं इंजिन बनवण्यासाठी 2015 मध्ये सागरमाला योजना सुरू करण्यात आली. भारताचं भौगोलिक शक्तिस्थान असलेल्या किनारपट्टीच्या साह्याने विकास, रोजगारनिर्मिती आणि व्यापाराला बळकटी देण्याचं काम या योजनेच्या माध्यमातून सुरूआहे. सहा लाख कोटींहून अधिक किमतीचे 845 पेक्षा जास्त प्रकल्प या अंतर्गत सुरू असून 315 प्रकल्प पूर्ण झाले आहेत.आज नऊ भारतीय बंदरांचा जगातल्या सर्वोत्तम 100 बंदरांमध्ये समावेश झाला असून किनारपट्टीवरची जहाजवाहतूकही मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. देशातल्या प्रमुख बंदरांच्या क्षमतेतही 2014 च्या तुलनेत जवळपास दुपटीने वाढ झाली आहे. या योजनेमुळे बंदरांचे आधुनिकीकरण, रस्ते आणि रेल्वेमार्गांची जोडणी, औद्योगिकीकरण, किनारपट्टी भागातल्या समुदायाचा विकास, जलवाहतूक आणि अंतर्गत जलमार्ग या 5 घटकांना एकत्र जोडलं आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून वैष्णवी संयोग.***

**सेवा संकल्प अभियान**

महिला शेतकऱ्यांना अधिकृत ओळख मिळवून देण्यासाठी आयोजित ग्रामसभांमध्ये बीड जिल्ह्यानं राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे. राज्य सरकारच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत हा उपक्रम राबवण्यात आला. जिल्ह्यात एकंदर 267 ग्रामसभा आयोजित केल्याची माहिती काल कृषी विभागानं दिली आहे. सेवा संकल्प अभियानांतर्गत सांगली जिल्हा प्रशासनानं आयोजित केलेल्या राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमात हृदयरोगाची शक्यता असलेल्या 208 बालकांची मोफत तपासणी करण्यात आली.

**आंदोलन मागे**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कारभाराच्या विरोधात पुण्यात गेले काही दिवस सुरू असलेल्या परिक्षार्थींच्या आंदोलनाला आमदार शिवेंद्रराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळानं काल भेट दिली. विद्यार्थांच्या सर्व मागण्या या शिष्टमंडळानं मान्य केल्यामुळे 11 दिवसांपासून सुरू असेलेलं आंदोलन मागे घेत असल्याचं आंदोलकांनी सांगितलं. एम. पी. एस. सी. पेपरफुटी प्रकरणात राज्य सरकारने न्यायालयीन चौकशीची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाचे  अध्यक्ष विवेक भिमनवार यांनी चौकशीसाठी नैतिकतेला प्राधान्य देत,  चौकशी पूर्ण होईपर्यंत पदावर कार्यरत न राहण्याचा निर्णय घेतल्याचं समाज माध्यमातील संदेशाद्वारे जाहीर केलं आहे. या समितीत एफ. डी. ए. चे आयुक्त तुकाराम मुंडे यांचा समावेश करण्याची आंदोलकाची मागणी मान्य केल्याचं भोसले यांनी यावेळी सांगितलं.

**पाणी पुरवठा योजना**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या तीन गावांतल्या नळ पाणीपुरवठा योजनेचं संचालन, देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी महिला बचत गट आणि ग्रामसंघांकडे देण्यात आली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत करण्यात आलेला हा देशातला पहिलाच प्रयोग आहे. तो यशस्वी झाल्याची माहिती रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वैदेही रानडे यांनी दिली

**क्रिकेट**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात काल इंदूर इथं झालेल्या तिसऱ्या टी-20 सामन्यात, भारताने पाहुण्या संघावर 14 धावांनी विजय मिळवत मालिकेत 2-1 अशी आघाडी घेतली. भारताने दिलेलं 223 धावांचं लक्ष्य गाठताना वेस्ट इंडिजला निर्धारित 20 षटकांत 209 धावांपर्यंतच मजल मारता आली. भारताकडून अभिषेक शर्माने आक्रमक फलंदाजी करत 30 चेंडूंत 69 धावा ठोकल्या. 3 बळी टिपणारा अर्शदीप सिंह सामनावीर ठरला. 5 सामन्यांच्या या मालिकेतला चौथा सामना येत्या बुधवारी हैद्राबाद इथं होणार आहे.

**हवामान**

राज्यभरात आज हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**